पोलीस उप आयुक्त (मुख्यालय),
मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय
कार्यालयाचा पत्ता-सेक्टर ५, रामनगर, शांतीगार्डन, मिरा-रोड (पुर्व),
ठाणे.४०११०७ फोन नंबर-०२२-२९४५१००
E-mail:-dcphq.mb-vv@mahapolice.gov.in

**जा.क्र.- पोउपआ(मुख्या)/प्रवेश बंद/वाह./अधिसुचना/ १०० /२०२५** **दि.१०/०२/२०२५**

**मिरा-भाईदर शहरात वाहतूक कोंडी होऊ नये याकरीता कायमस्वरुपी वाहतूक नियंत्रण अधिसूचना/आदेश**

---

**ज्याअर्थी** काशिमीरा वाहतूक विभाग, परिमंडळ-१ चे प्रभारी पोलीस निरीक्षक यांनी त्यांचे कडील जा. क्र. २२७/२०२५, दि.- ०६/०२/२०२५ अन्वये असे निदर्शनास आणुन दिले आहे की, मुंबई पोलीस आयुक्ताल यांनी त्यांचेकडील क्र.२६/वानिशा/अपोआ/कायमस्वरुपी अधिसुचना/मुंबई/२०२४ दि.२४/०१/२०२४ अन्वये अधिसूचना पारीत करून बृहन्मुंबई शहरातील वाहतूक सुरळीत चालण्या करिता व वाहतूकीचे व्यवस्थापन योग्य रितीने होण्याकरिता मुंबई शहराचे उत्तर बाजूकडून येणाऱ्या अवजड वाहनांना म्हणजेच काशिमीरा मधून **वेस्टर्न एक्सप्रेस हायवे** व सर्व्हिस रोडचे दक्षीण वाहिनी वरून दहिसर टोलनाका मार्गे मुंबईत प्रवेश करणाऱ्या अवजड वाहनांना **(ट्रक,ट्रेलर,मल्टी एक्सल वाहन व प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या आंतरराज्य आणि आंतरजिल्हा खाजगी बसेस) सकाळी ०८.०० ते सकाळी ११.३० वा. पर्यंत प्रवेश बंद केले बाबत अधिसूचना पारित केलेली आहे.**

परिणामी मिराभाईंदर शहरात वेस्टर्न एक्सप्रेस हायवेवर दहीसर चेकनाक्यापासून वाहनांच्या मोठया रांगा लागून मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. यामुळे इतर लहान वाहने, अत्यावश्यक सेवेतील वाहने, ॲम्बुलन्स, व्हिआयपी कॅनवाय इ. अडकून बसून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. यामुळे मिराभाईंदर शहरात राष्ट्रीय महामार्ग व सर्व्हिस रोडवरील तसेच शहरातील इतर महत्वाचे रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वर्सोवा बाजूकडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या जड-अवजड वाहनांना नमुद कालावधीचे अनुषंगाने वरसावे पोलीस चौकी /हॉटेल फाऊंटन याठिकाणा वरुन आत प्रवेश करण्यास प्रवेश बंद करणे वाहतूक नियोजनाच्या दृष्टीने आवश्यक झाले आहे. तसेच मुंबई-अहमदाबाद वेस्टर्न एक्सप्रेस हायवेवर नविन वरसावे पुलावर सेल्फी घेण्यासाठी वाहने थांबतात यामुळे सदर पुलावर वाहतूक कोंडी व अपघात देखील होत आहेत. करिता मुंबई-ठाणे बाजूकडून गुजरात बाजूकडे जाणारे व गुजरात बाजूकडून मुंबई कडे येणा-या नविन पुलावर दोन्ही वाहिनीवर वाहन थांबण्यास प्रतिबंध **नो-पार्किंग** करणे आवश्यक झाले आहे.

**त्याअर्थी** मी सुहास बावचे, पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या वाहतूक विभागाचा पोलीस उप-आयुक्त म्हणून शहरातील रस्त्यांवर वाहतूक कोंडी होऊ नये तसेच जनतेस पोहोचणारा धोका, अडथळा आणि नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (१) (ब) प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे **जड-अवजड वाहनांस प्रवेश बंद असल्याबाबत अधिसुचना जारी करीत आहे.**

**वाहतूकी करीता सुरु व बंद करण्यात येणारा मार्ग व कालावधी**

१. मुंबई- अहमदाबाद **वेस्टर्न एक्सप्रेस हायवे** वरुन वर्सोवा बाजूकडून मुंबईकडे जाणारी जड अवजड वाहनांना **सकाळी ०७.४५ वा. ते ११.१५ वाजेपर्यंत वरसावे पोलीस चौकी फांऊटन** हॉटेल ते दहिसर टोल नाक्याकडे (वेस्टर्न एक्सप्रेस हायवे व सर्व्हिस रोडवरुन) तसेच ठाणे-घोडबंदर रोड मार्गे मिरा-भाईंदर शहरात **प्रवेश करण्यास मनाई करण्यात येत आहे.**

२. मुंबई-अहमदाबाद वेस्टर्न एक्सप्रेस हायवेवर मुंबई,ठाणे बाजूकडून गुजरात बाजूकडे जाणारे व गुजरात बाजूकडून मुंबई कडे येणा-या **वरसावे नविन पुलावर** दोन्ही वाहिनीवर **नो-पार्किंग**

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालच्या हद्दीत येणारी अत्यावश्यक सेवेतील वाहने जसे पोलीस वाहने, महसूल विभागाची वाहने, फायरब्रिगेड, पिण्याच्या पाण्याचे टँकर, स्कूल बसेस, भाजी-पाला वाहून नेणारी वाहने, रुग्णवाहिका, पोलीसांनी परवानगी दिलेली वाहने, जिल्हा दंडाधिकारी मुंबई, ठाणे, पालघर व मनपा आयुक्त मुंबई, मिरा-भाईदर, वसई-विरार तसेच भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी परवानगी दिलेल्या वाहनांना लागू राहणार नाही.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना मी सुहास बावचे, पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय, मिरा-भाईंदर, वसई- विरार आज दिनांक-१० /०२/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी जाहीर करत आहे.

पोलीस उप आयुक्त (मुख्या.) ★ मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय ★ सत्यमेव जयते

10/02/25

( सुहास बावचे )
पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय)
मिरा-भाईंदर, वसई-विरार

**आवश्यक कार्यवाहीकरीता प्रत-**

१. सहायक पोलीस आयुक्त, वाहतूक व मिरारोड, भाईंदर मिरा-भाईंदर, वसई-विरार
२. कार्यकारी अभियंता, मिरा-भाईंदर महानगरपालीका **शहरात प्रवेश बंद दाखवणारे फलक** लावून घेणे बाबत.
३. प्रभारी अधिकारी काशिमीरा वाहतूक, चिंचोटी वाहतूक, वसई वाहतूक , विरार वाहतूक विभाग प्रभारी अधिकारी- काशिमीरा व काशिगांव, नायगांव पोलीस ठाणे योग्य बंदोबस्त नेमण्यासाठी.
४. जनसंपर्क अधिकारी, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय (अधिसूचना प्रसिद्धीसाठी)
५. मॅनेजर, जे.एन.पी.टी, नवी मुंबई

**प्रत सस्नेह अग्रेषित –**

पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१, मिरा-भाईंदर वसई-विरार

**प्रत माहितीस्तव सविनय सादर –**

१. मा. पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
२. मा. अपर पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
३. मा. जिल्हाधिकारी, ठाणे
४. मा.आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका